**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**(सकाळ)**

जा.क्र. ४७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०६/२०१७

**१) बकऱ्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २३/०६/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. कौशल्या दयाराम सोनकुसरे वय ५५ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा चे दयाराम सोनकुसरे याने त्याचे मसलकीच्या २ बकऱ्या १) लाल रंगाची बकरी २) लाल रंगाची पांढरे डागे असलेली दोन्ही एकुन किंमती ३०००/रू. च्या बकऱ्या फिर्यादीचे पतीने चारण्यास नेले असता बकऱ्या तेथेच सोडुन घरी पाणी पिण्याकरिता गेला असता पुन्हा परत बकऱ्या दिसुन आल्या नाही. कोणीतरी अज्ञात चोराने बकऱ्या चोरून नेल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.फटिंग पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करून विवाहीतेचा माहेरून पैसे आणण्याचे कारणावरून शरिरीक व मानसिक छळ करून मारपिठ शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक ०१/०२/२०१७ ते १७/०५/२०१७ पर्यत यातील फिर्यादी आरोपी क्र. १ते ४ यांनी संगनमत करूने फिर्यादीस माहेरून १०,०००००/रू. व दागीने घेंवुन ये म्हणुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करून तिला मारपीठ, शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी देवुन घराचे बाहेर हाकलुन लावल्याने फिर्यादी सौ. अर्चणा अभिषेक वर्मा वय ३३ वर्ष रा. टंडन वार्ड भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. कुंभरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २५/०६/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील विधी संघर्ष बालकाने फिर्यादी ची पिडीत नातीन वय ०७ वर्ष हिला चॉकलेट देवुन तिला आपले घरी नेवुन तिचेवर अत्याचार केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबावाही येथे कलम ३७६,(२) (जे) (आय) भांदवि. सहकलम ४,६ बा. ले. अ. सं. अधि. २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोंटीग पो.स्टे. गोबावाही हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून शिवीगाळ,मारपिट करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/०६/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील फिर्यादी पिडीत मुलगी ही आपले मैत्रीनी सोबत टयुशन क्लॉसेस संपल्यावर साकोली बसस्थानक येथे जात असतांना यातील आरोपीने पिडीत मुलीचा पाठलाग करून तीला थांबवुन समोरे मोटार सायकलने येवून बोलला कि तु माझा सोबत चल तेव्हा मुंलीने नकार दिल्याने तिचा हाथ पकडुन मोटार सायकलवर बसविण्याचा प्रयत्न करून पिडीत मुंलीने प्रतिकार केल्याने तिचे डोक्याचे केस पकडुन थापडाने गालावर मारून कपडे पकडुन ओढतान करून विनयभंग केला व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४,(ड),३२३,५०६ भांदवि. सहकलम १२ बाल लैंगीक अत्याचार पासुन बालकाचे संरक्षण कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. फुकट पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) संगनमत करून क्षुल्लक कारणावरुन भांडण करून काठीने कपाळावर मारून जखमी करून दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०६/२०१७ चे ०३.५८ वा . दर. यातील आरोपी क्र.२ हा घरासमोरील अंगनात आपले वडीलासोबत भांडन करून चपलाने मारीत असता फिर्यादीचे पती रविकुमार ऊके यांनी तु कशाला मारतो असे हटकले असता आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करून फिर्यादीचे पतीला तु आम्हाला बोलणारा कोण असे म्हणुन या कारणावरून भांडन करून आरोपी क्र. २ फिर्यादीचे पतीस थापड बुक्यांनी मारहान करून खाली ढकलुन जखमी केले व दोन्ही आरोपीतांनी त्यास मारण्यास काठया उचलले असता फिर्यादीने पतीला कशाला मारता म्हणुन आडवी झाली. असता आरोपी क्र.१ ने फिर्यादीचे कपाळावर काठीने मारून जखमी करून दुखापत केल्याने व आरोपी क्र. २ ने जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. संगीता रविकुमार ऊके वय ३० वर्ष रा. गिरोला यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून_पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत. फिर्यादी

**६) दारू पिऊन दारूचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/०६/२०१७ चे २२.५९ वा. यातील आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन दारू पिऊन दारूचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहलचे प्रमान मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) ३/१८१ मोवाका. भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहबा. मते पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**७) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास धडक दिल्याने दोन ईसम जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने :–**

दिनांक २४/०६/२०१७ चे २२.०० वा. दर. फिर्यादी रामकृष्ण रामगोपाल अग्रवाल वय ३५ वर्ष रा. रामकुंज बाजपेयी वार्ड गोंदिया हा त्याचे चार चाकी वाहने क्र. एमएच ३५ पी १३९७ ने आपले परिवारासह वाहनी कडुन तिरोडाकडे जात असता वाहनी शिवारात डांबरी रोडावर तिरोडयाकडुन वाहनीकडे येणाऱ्या आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनास धडक दिल्याने मोटार सायकल चालक हा स्वत: व मागे बसलेला शुभम अशोक लारोकर वय २० वर्ष रा. सिहोरा यास जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे सिहोरा येथे कलम २७९,३३७,३३८भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**८) संगनमत जमिनीच्या कारणावरून भांडण करून काठीने डोंक्यावर मारून जखमी करून फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०६/२०१७ चे १७.१९ वा . दर. यातील आरोपीतांनी सामाईक ईरादा करून जमिनीची नोंदनी करण्यास फिर्यादीस सांगीतले होते यावर फियादीने नोंदनी वर मी सही करणार नाही. असे म्हटले होते या कारणावरून भांडन करून काठीने फिर्यादीचे डोक्यावर,पायावर,पाठीवर मारूने व उजव्या हातावर मारून फॅक्चर केल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून_पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२५,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**८) सापाने चावा घेतल्याने औषधोपचार दरम्यान तरूणाचा मृत्यु :—**

दिनांक २६/०६/२०१७ चे १४.४८ वा. दर. यातील मृतक प्रभुदय सुर्यभान रामटेके वय २८ वर्ष, रा. नेरला यास डाव्या हाताचे अंगठयाला सापाने चावा घेतल्याने त्यासे सा.रू. भंडारा येथे औषधोपचारा करीता नेले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. सोनवाने यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**९) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक २६/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे गोबरवाही, लाखनी व लाखांदुर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारु किंमती ६००/—रु. ४ लिटर ४१० मिली देशी/विदेशी दारु किंमती १९९४/—रु. असा एकुण किंमती २,५९४/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २६/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.